**दिनांक १७.१२.२०२५**

**शपथेवर वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा उर्वरित उलटतपास प्रतिवादी क्र. १ तर्फे – सी.व्ही.जाधव विद्यमान वकील यांचे मार्फत सुरु.**

**९.** मागील ३ महिन्याच्या कालावधीमध्ये मी ग्रामपंचायत कार्यालयामध्ये जावून दावा कलम १ ब मध्ये नमूद असलेलया रस्त्याबद्दलचा कागदोपत्री पुरावा ग्रामपंचायतीला मागितला आहे. ग्रामपंचायतीने मला कागदपत्र दिले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ते कागदपत्रे आजपर्यंत न्यायालयात दाखल केलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दावा कलम१ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोणताही रस्ता अस्तित्वात नाही आणि त्यासंदर्भातील कोणताही अभिलेख ग्रामपंचायत दप्तरी नाही, त्यामुळे मी तो दाखल केला नाही.

**१०.** हे म्हणणे खरे आहे की, दावा कलम १अ नमूद केलेल्या घरमिळकतीचे क्षेत्र दाव्यात आणि माझ्या सरतपासाच्या शपथपत्रात कोठेही नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा कलम १ अ मध्ये त्या मिळकतीचे क्षेत्रफळ नमूद करण्यास मला कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यामध्ये दावा कलम१ब मध्ये वादग्रस्त मिळकतीचे क्षेत्रफळ नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा कलम १ अ मध्ये असलेल्या क्षेत्रफळापेक्षा जास्त क्षेत्रावर मी माझ्या घराचे बांधकाम केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की सदरचे बांधकाम मी अतिक्रमण करुन केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी अतिक्रमण करुन बांधकाम केले असल्याने दावा कलम १अ मध्ये मिळकतीचे क्षेत्रफळ नमूद केले नाही. दावा कलम १ अ चे क्षेत्रफळ मला सांगता येणार नाही. मला मी बांधकाम केलेल्या घराचे क्षेत्रफळ सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी अतिक्रमण करुन बांधकाम केले असल्यामुळे जाणीवपूर्वक दाव्यामध्ये आणि आजही १अ चे क्षेत्रफळ सांगत नाही.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, दावा कलम१ब या मिळकतीचा उतारा दाव्यात

हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा कलम १ब अस्तित्वात आहे असा दर्शविणारा कोणाताही कागदोपत्री पुरावा/अभिलेख आजतारखेपर्यंत या प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा कलम १ ब ही मिळकत /तथाकथित रस्ता अस्तित्वात आहे असे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. माझ्याकडे १९८१ साली न्यायालयाने दिलेल्या निकाल ज्यामध्ये रस्ता दिला आहे, तो कागदोपत्री पुरावा आहे आणि रस्त्याला आडकाठी केल्यानंतर दिलेल्या तक्रारीनुसार मुख्याधिकारी यांनी गट विकास अधिकारी यांना दिलेले चौकशीचे आदेश व प्रतिवादींची असलेली चुकीची नोंद रद्द करण्याबाबतचे आदेश मुख्याधिकारी यांचे आहेत. सद्या प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने ती नोंद अद्याप महसूल दप्तरी कमी झालेली नाही. १९८१ सालचा न्यायालयाचा आदेश आणि मुख्याधिकारी यांनी दिलेले आदेश न्यायालयात दाखल करण्यास मी तयार आहे. सन २०१९ सालापासून ते आजतागायत सदर कागदपत्रे पुरावा म्हणून दाखल करा असे मी माझ्या विधिज्ञांना म्हणालो नाही. सदर कागदपत्रे विधिज्ञांना सांगून न्यायालयात दाखल करण्यास अडचण नव्हती. साक्षीदार सांगतात की, मुख्याधिकारी यांनी दिलेले आदेश, चौकशी समिती २०१९ नंतरची आहे. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथित १९८१ चा न्यायालयाचा निकाल, मुख्याधिकारी यांचा आदेश असा कागदोपत्री पुरावा नसल्यामुळे तो आहे असे मी बोगस व खोटे सांगत आहे आणि त्याकारणास्तव न्यायालयात दाखल केलेला नाही.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, दावा कलम १ब मध्ये २० X १५० फूट एवढे क्षेत्रफळ दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसा कागदोपत्री पुरावा याकामात आजपर्यंत दाखल केलेला नाही. मला घर क्र.१०१ माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमचे घर मिळकती १अ च्या उत्तर बाजूला प्रतिवादी क्र.१ व २ ची ग्रामपंचायत मिळकत क्र.५२/अ मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आजमितीस ग्रामपंचायत दप्तरी मिळकत क्र.५२/अ चा उतारा

प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या नावे निघतो. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायत मिळकत क्र.५२/अ आणि दावा कलम १अ या एकमेकांना लागून आहेत. माझ्या मिळकतीच्या उत्तर बाजूला ग्रामपंचायत मिळकत क्रमांक नाही.

**१३.** दावा कलम१ अ मध्ये माझी दुमजली बांधकाम केलेली इमारत आहे. हे मला निश्चित सांगता येणार नाही की, त्या बांधकाम केलेल्या इमारतीचे क्षेत्रफळ ३५ X २० चौ.फूट आहे किंवा कसे. मला मी बांधकाम केलेल्या इमारतीचे निश्चित क्षेत्रफळ सांगता येणार नाही. मी मुख्याध्यापक म्हणून नोकरी करतो. माझे शिक्षण बी.ए.बी.एड आहे. माझा इंग्रजी विषय आहे. मला गणित विषयाचे ज्ञान बारावीपर्यंतचे आहे. मला लांबी, रुंदी, फूट या गोष्टी समजतात. मी दावा दाखल करताना दावा कलम१अ या मिळकतीचा उतारा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या उता–यावर २४ X ५ असे नमूद दिसते. असे घडले नाही की, आजपर्यंत मी ग्रामपंचायतला अर्ज देवून माझी घरमिळकत १०१ चे क्षेत्रफळ वाढवून घेतले आहे. माझ्या घराचे बांधकाम सन २०१७–२०१८ सालापासून चालू झाले होते. हे म्हणणे खरे नाही की माझ्या घराचे बांधकाम सन २०१९ मध्ये संपले. साक्षीदार सांगतात २०२० मध्ये संपले. सन २०१९ मध्ये दावा दाखल करताना माझ्या घराचे बांधकाम पहिल्या मजल्याचे स्लॅब लेवलपर्यंत आले होते. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१९ मध्ये माझे घराचे पूर्ण बांधकाम झालेले नव्हते.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, सन २०१९ मध्ये माझ्या घराचे बांधकाम सुरू असताना आणि दावा दाखल करण्यापूर्वी माझी आणि प्रतिवादी क्र.१ व २ यांची बाचाबाची झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी प्रतिवादी क्र.१ व २ यांनी मला म्हणाले होते की,''तुम्ही मोजणी करुन घ्या, तुमचे क्षेत्र २४ X ५ आहे, तुम्ही आमच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम करु नका'' असे समजावले होते. हे म्हणणे

खरे नाही की, तरीदेखील मी प्रतिवादी क्र.१ व २ यांना न जुमानता माझ्या घराचे बांधकाम ३५ X २० फूट मापाचे करुन दुमजली इमारत उभी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दुमजली घराच्या उत्तर बाजूला खिडक्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींच्या मिळकतीच्या दक्षिण बाजूने त्यांच्या क्षेत्रामध्ये अतिक्रमण करुन घर बांधले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या घराच्या पुर्वेला आणि दक्षिणेला देखील इतरांच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन माझ्या घराचे बांधकाम केले आहे.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की माझ्या घराचे बांधकाम सुरू असताना ग्रामपंचायत सदस्य, प्रतिवादी क्र.१ व २, कैलास पाटील व गावातील इतर लोकांनी मला व माझ्या भावाला बैठकीसाठी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर बैठकीत आमचा वाद मिटला नाही. हे म्हणणे खरे नाही की, हे लोक चिडून जावून माझ्यावर अतिक्रमणाची केस करतील म्हणून मी त्यांच्याविरुध्द खोटे कारण दाखवून हा खोटा दावा दाखल केला आहे.

**१६.** रंगनाथ सोपान साळूंखे यांना मी ओळखतो. साक्षीदार सांगतात ओळखत होतो, ते मयत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या इमारतीच्या पुर्व बाजूला रंगनाथ साळुंखे यांची मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, या मिळकतीच्या थोड्या अंतरावर एक मस्जिद आहे. हे म्हणणे खरे आहे की, मस्जिदीपासून रंगनाथ साळूंखे यांच्या घरापर्यंत येण्याकरिता एक सरळ रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, पूर्वीपासून मस्जिदीपासून रंगनाथ साळुंखे यांच्या घरापर्यंत येण्याकरिता त्या रस्त्याने आमचे आमच्या क्षेत्रामध्ये येणे–जाणे वडीलांच्या काळापासून आहे. साक्षीदार सांगतात की, मस्जिदीपासून दोन रस्ते आहेत, एक पुर्वेकडून आणि एक पश्चिमेकडून आहे. हे म्हणणे खरे नाही की मी दाव्यात कथन केल्याप्रमाणे आणि १ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे असा कोणताही रस्ता कधीही अस्तित्वात नव्हता व नाही.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की मिळकत क्र.५२अ च्या उत्तरेला प्रतिवादी क्र.१ दगडूची याची एकट्याची मिळकत क्र.६९ आहे. ग्रामपंचायत मिळकत क्र.६९ च्या उत्तरेला ग्रामपंचायत मिळकत क्र.६०,७६,७७,७४,७५,७३,७१,७२,७० अशा मिळकती असाव्यात. हे म्हणणे खरे आहे की, दिनकर, निवृत्ती, बाळासाहेब, भुजंग, रंगनाथ, आबा, बापू, विमल पवार इत्यांदीच्या या मिळकती आहेत.

प्रश्नः– दावा कलम१ब मध्ये तथाकथित नमूद केलेल्या रस्त्यावर ग्रामपंचायत मिळकत क्र.५२अ,६९,६०,७६,७७,७४,७५,७३,७१,७२,७० अशा मिळकती आहेत ?

उत्तरः– या मिळकती रस्त्याच्या पश्चिम बाजूला आहेत.

**१८.** हे म्हणणे खरे नाही की, या रस्त्याच्या पश्चिम दिशेला उपरोक्त नमूद मिळकती आहेत असे दाखविणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. साक्षीदार सांगतात की, १९८१ चा न्यायालयाचा निकाल आणि ग्रामपंचायतीचा ठराव हे कागदपत्रे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायत मिळकत क्र.५२अ, ६९, ६०, ७६, ७७, ७४, ७५, ७३, ७१, ७२, ७० या मिळकतीच्या घरासमोर अंगण आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी जो तथाकथित रस्ता म्हणत आहे, ते अंगणच आहे. दिनकर, निवृत्ती, बाळासाहेब, भुजंग, रंगनाथ, आबा, बापू, विमल पवार यांच्यापैकी कोणालाही मी १ब प्रमाणे रस्ता आहे या मुद्यावर साक्षीदार म्हणून तपासणार नाही. साक्षीदार सांगतात की, ते कसे येतील. हे म्हणणे खरे नाही की, या लोकांच्या घरासमोर रस्ता नसून त्यांचे अंगण असल्यामुळे ते लोक साक्षीला येणार नाहीत.

**१९.** हे मला माहित नाही की रंगनाथ साळुंखे यांच्या घरापासून मस्जिदीपर्यंत जाणा–या उत्तर–दक्षिण रस्त्याची नोंद ग्रामपंचायत दप्तरी नमुना क्र.९ मध्ये नमूद आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, रंगनाथ साळूंखे, ईश्वरा साळुंखे, नवनाथ साळुंखे यांच्या घरातील सदस्य याच रस्त्याने पूर्वीपासून ये–जा करतात. दि ०३.०९.२०१९ पासून म्हणजेच कैफियत दाखल केलेल्या तारखेपासून ग्रामपंचायत दप्तरी जावून सदर

रस्त्याची म्हणजे नमुना क्र.९ मध्ये नोंद आहे किंवा नाही याची खात्री केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, तशी नोंद पाहण्यास मला अडचण नव्हती. हे मला सांगता येणार नाही की, १ब मध्ये नमूद केलेल्या रस्त्याची नोंद ग्रामपंचायत दप्तरी नमुना क्र.९ मध्ये नाही किंवा कसे.

**२०.** हे म्हणणे खरे नाही की मी कथन केल्याप्रमाणे दावा कलम१ब हा रस्ता कधीही अस्तित्वात नव्हता व नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादींची मिळकत लबाडीने, न्यायालयाचा धाक दाखवून हडप करण्यासाठी मी हा प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी केलेले अतिक्रमण झाकून जावे म्हणून मी हा खोटा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटया मजकूराचे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

समक्ष

RAHUL BHALCHANDRA KULKARNI

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.12.17 17:07:46 +0530

दिनांक –१७.१२.२०२५.

**(आर. बी. कुलकर्णी)**

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, आटपाडी.